**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळातर्फे कार्यान्वित होणाऱ्या योजनांस मंजुरी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष**
**मागास प्रवर्ग कल्याण विभाग**
**परिपत्रक क्र.इमाव-२०००/३४८/प्र.क्र.३०/इमाव -६**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक. ०८ फेब्रुवारी, २०००**

**संदर्भ :- १)** शासननिर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक. इमाव — १०९६/प्र.क्र.३९५/विघयो-२, दिनांक २५ सप्टेंबर, १९९८.

**२)** व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, मुंबई — ४०० ०७१ यांचे पत्र क्र.ओबीसी — एफडीसी /२०००/सीआर -८४, दिनांक १ फेब्रुवारी, २००० .

**परिपत्रक :** महाराष्ट्र शासनाने शासननिर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक इमाव — १०९६/प्र.क्र.**३९५**/विघयो-२, दि.२५ सप्टेंबर, १९९८ अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाच्या योजनांना त्या महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २७ जानेवारी, २००० रोजी झालेल्या बैठकीत ठरविलेल्या अटी व शर्तीनुसार महामंडळामार्फत बीज भांडवल योजना तसेच राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाच्या योजना राबविण्यासाठी खालील तपशीलानुसार मंजुरी देण्यात येत आहे. :-

**१) बीज भांडवल कर्ज योजना :**ही योजना महामंडळ राबविणार असुन त्याची प्रकल्प मर्यादा रु.३.०० (तीन) लाखापर्यंत राहील. लाभार्थीने सादर केलेल्या एकुण प्रकल्प खर्चाच्या २० टक्के रक्कम महामंडळ बीज भांडवल कर्ज म्हणून देईल. त्या कर्जावर ६ टक्के व्याज आकारण्यात येईल. लाभार्थ्यांचा सहभाग एकुण योजनेच्या ५ टक्के राहील. प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्के इतके कर्ज बँकेमार्फत मंजुर करण्यात येईल. बँक कर्जाची परतफेड बँकेच्या अटी व शर्तीनुसार राहील.

**२) राष्ट्रीय मागासवर्ग वित्त व विकास महामंडळाच्या योजना :** यामध्ये दीर्घ मुदतीची कर्ज योजना व बीज भांडवल योजना या दोन योजना असतील.

**अ) दीर्घ मुदती कर्ज योजना** : या योजनेंतर्गत प्रकल्प खर्च मर्यादा जास्तीत जास्त रु.५.०० (पाच) लाख पर्यंत असेल. प्रकल्प खर्चाच्या ८५ टक्के केंद्रीय महामंडळाचे कर्ज राहील.

त्यावर ७ ते १० टक्के दराने व्याज आकारण्यात येईल. लाभार्थ्याचा सहभाग प्रकल्प खर्चाच्या ५ टक्के राहील, तर राज्य महामंडळ प्रकल्प खर्चाच्या १० टक्के इतके बीज भांडवल कर्ज त्यावर वार्षिक ६ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल.

**ब) <u>बीज भांडवल योजना :</u>** या योजनेंतर्गत प्रकल्प खर्चाच्या ४० टक्के परंतु, जास्तीत जास्त रु.२.०० (दोन) लाख इतके कर्ज केंद्रीय महामंडळ मंजुर करेल. त्यावर ७ ते १० टक्के व्याज आकारण्यात येईल. एकुण रक्कमेच्या ५ टक्के इतका लाभार्थ्याचा सहभाग राहील व प्रकल्प खर्चाच्या ५ टक्के इतकी रक्कम राज्य महामंडळ बीज भांडवल कर्ज म्हणून मंजुर करेल त्यावर ६ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल. प्रकल्प खर्चाच्या उर्वरित ५० टक्के सहभाग बँकेमार्फत बीज भांडवल कर्ज म्हणून मंजुर करण्यात येईल. त्याची परतफेड बँकेच्या अटी व शर्तीनुसार लाभार्थ्याला करावी लागेल.

२. अर्जदाराची अर्हता व सोबत जोडावयाच्या कागदपत्रांचा तपशील खालीलप्रमाणे :

**अ) <u>अर्जदाराची अर्हता :</u>**

(१) अर्जदार इतर मागासवर्गीय असावा.

(२) तो महाराष्ट्राचा सर्वसाधारण रहिवाशी असावा, त्याचे वय १८ ते ५० वर्षे असावे तसेच तो कोणत्याही बँकेचा महामंडळाचा किंवा वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

(३) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागासाठी रु.३१,९५२/- तर शहरी भागासाठी रु.४२,४१२/- या मर्यादेत असावे.

(४) कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल.

(५) कर्जाच्या इतर अटी व शर्ती महामंडळ ठरवील त्याप्रमाणे राहतील.

**<u>ब) सादर करावयाची कागदपत्रे :</u>**

(१) सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या (Cremeleyer Certificate) उत्पन्नाच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती.

(२) शिधापत्रिकेची प्रमाणित प्रत व पासपोर्ट साईज फोटो.

(३) भाडे पावती करारनामा, ७/१२ उतारा, दोन जामीनदार व शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती.

(४) स्थानिक स्वराज्य संस्थाचे व्यवसाय करण्याबाबतचे ना – हरकत प्रमाणपत्र.

(५) अर्जदाराला ज्या प्रयोजनासाठी कर्ज मंजुर होणार आहे त्याच प्रयोजनासाठी त्याचा उपयोग करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.

१. सद्यस्थिती या महामंडळाची कर्जे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत विभागीय व जिल्हा पातळीवर मंजुर करावयाची असल्याने त्या महामंडळाच्या संबधीत जिल्हा समितीद्वारे अशी कर्ज प्रकरणे मंजुर करुन अंतिम मंजुरीसाठी व निधीच्या

वाटपासाठी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, मुंबई यांजकडे पाठवावीत.

२. शासनाने हाती घेतलेल्या १०० दिवसांच्या विशेष कार्यक्रमाची अंमलबजावणी त्वरीत होण्याचे दृष्टीने आणि मंजुर केलेल्या योजनांमध्ये कोणत्याही वित्तीय अर्थसहाय्याचा अंतर्भाव नसल्यामुळे प्रशासकीय पातळीवर हे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

- स्वाक्षरीत /-

(वि.वि.फाटक)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत** :-

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, मुंबई,

व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मुंबई,

आयुक्त, समाजकल्याण व संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,

सर्व मंत्रालयीन विभाग,

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

सर्व जिल्हाधिकारी

सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,

सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी

समाजकल्याण अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,

सर्व प्रादेशिक व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ,

सर्व जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ,

निवड नस्ती — इमाव - ६